VOL- VI ISSUE-VIII AUGUST 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# शासकीय दवाखान्यात काम करणा-या महिला डॉक्टरांचे धार्मिक व सांस्कृतीक जीवन

**प्रा. मनोज पवार**
कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय,हडोळती,
ता.अहमदपूर जि.लातूर.

**प्रस्तावणा :-**

हिंदू धर्मामध्ये मुळात स्त्रीला देवता मानले आहे. परंतु नंतरच्या काळात तिला दासी बनवण्यात आले. समानता, स्वातंत्र्य, बंधुता लोकशाही या संकल्पना सर्जनशील मानव म्हणून जीवन जगताना आवश्यक आहेत. परंतु आजही उच्चशिक्षित महिलांना ज्या पुरुषांच्या बरोबरीने अर्थाजन करतात त्यांना समानतेची वागणूक मिळत नाही. धर्माचा आधार घेऊन त्यांच्यावर अनेक बंधने लादली जातात म्हणजेच त्यांचे स्वातंत्र हिरावून घेतले जाते. महिला जरी अर्थाजन करुन आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्या तरीही सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून त्यांना दुय्यम किंवा कनिष्ठ मानले जाते. संपत्ती, शिक्षण, राजकारण, धर्म, संस्कृती अशी सर्वच साधने पुरुषत्ताक व्यवस्थेत पुरुषांच्या हाती आहेत.नैसर्गिक धर्म,कर्तव्य,कौटोंबिक स्वारुथ, मातृत्व, प्रेम इत्यादी गोंडस नावाखाली अनादी काळापासुन आजही स्त्रिया दुय्यम स्थान स्वीकारत राहिल्या किंबहुना यामध्येच धन्यता मानत राहिल्या.

स्त्री जन्मापासुन ते मृत्युपर्यत सर्व अवस्थांमध्ये स्त्रियांना पुरुषांनी हीन लेखले आहे. हे ऐतिहासिक सत्य आहे. धर्मसंस्थेने अनेक प्रकारचे बंधने स्त्रीयांवरती लादलेले आहेत. धर्माधिष्ठित रुढी परंपरा यांमुळे स्त्रियांवरती अन्याय, शोषण, अत्याचार झालेला आहे. आताही होतो आहे. रुढी-प्रथा-परंपराचा पगडा, प्रत्येक धर्मातील खाजगी जीवन नियंत्रित करणारे धार्मिक कायदे उदा. (शरीयत कायदा), असमान स्त्री-पुरुष प्रमाण, समान नागरी कायद्याचा अभाव घरगुती हिंसाचार, हुंडाबडी, बलात्कार, विनयभंग यासारख्या असंख्य स्त्री प्रश्नांना आधुनिक काळात नोकरी करणाऱ्या महिलांना सामोरे जावे लागत आहे.

भारतीय समाजातील स्त्रीयांच्या समस्या या वेगवेगळ्या आहेत. त्यास अनेक पैलू आहेत. उदा. वेगवेगळ्या जाती, धर्म, प्रदेश यानुसार समस्येचे स्वरुप भिन्न-भिन्न आहे. भारतीय महिला धार्मिक परंपरेत जखडलेल्या आहेत.त्यामुळे त्या उपवास, व्रत-वैकल्य करुन, स्वत: उपाशिपोटी राहुन घरातील इतरांना म्हणतील तसे अन्न खाऊ घालतात. धर्म आणि संस्कृतीचा प्रभाव महिलांवर अधिक आसतो. हा प्रभाव ग्रामीण शहरी, निरीक्षर, साक्षर, घरकाम करणाऱ्या, शासकीय नोकरी करणाऱ्या सर्व महिलांवरती कमी अधिक प्रमाणात जाणवतो. महिला जन्मापासुन ते मरेपर्यंत धर्म आणि संस्कृती प्रमाणेच खाणे, पिणे, राहणे या गोष्टी करतात.त्यांच्या वैयक्तीक कौटोंबिक, सामाजिक कार्यात धर्म आणि संस्कृतीचा पगडा आसतो.

पुरुषप्रधान संस्कृतीने महिलांच्या प्रत्येक हालचालीवर नियंत्रण ठेवून त्यांना दास्यमय जीवन जगण्यास भाग पाडले आहे.भारतातील निरनिराळ्या धर्मात महिलाविषयक भिन्न-भिन्न दृष्टिकोन आहेत. काही धर्मामध्ये महिलांना देवी देवता म्हणून पुजले जाते तर काही धर्मामध्ये महिलांवर अनेक जाचक बंधने लादलेली आहेत.उदा. इस्लाम धर्मामध्ये स्त्रीला धर्मोपदेशक होता येत नाही. तिला काझी होता येत नाही. या धर्मात आजही काही पंथामध्ये, जातीमध्ये पडदा पध्दती आहे. विवाह हा येथे संस्कार न मानता करार मानला जातो. या ऊलट ख्रिश्चन धर्मात महिलांचा दर्जा उच्च आहे. या धर्मातील महिलांना धार्मिक कार्यात सहभाग घेता येतो. परंतु या धर्मात सुध्दा स्त्रियांना धर्माची पूर्ण जबाबदारी दिली जात नाही या धर्मातीही पुरुषी वर्चस्वी दिसते.पारसी धर्मामध्ये मात्र महिलांना कुटुंबात आणि समाजात मानाचे स्थान दिले जाते.त्यांना मालमत्तेचा अधिकार आहे.

हिंदु धर्मात महिलांना एकीकडे देवी, देवतांचा दर्जा असला तरी दुसऱ्या बाजुला त्यांच्यावर अनेक अपमानास्पद विशेषणे लावली जातात.शुद्राप्रमाणे हिंदु

महिलांना वेदाचे अध्ययन करण्याचा अधिकार नव्हता. तिच्याकडे एक उपभोगाची वस्तु म्हणून पाहिले जात होते तिने पतीशी एकनिष्ठ राहिले पाहिजे.तिने कोणत्याही प्रकारची तक्रार करुन नये. महिला ही अपवित्र आहे म्हणून त्यांना धार्मिक विधीत सहभागी करुन घेतले जात नाही. या धर्मात स्त्रियांना अनेक बाबतीत स्वातंत्र्य नाकारले आहे. तिचे व्यक्तीस्वातंत्र्य नाकारले आहे. धर्माच्या नावाखाली तिला सामाजिक बंधनात अडकवून ठेवले आहे.

बौध्द धर्मात स्त्रीविषयक दृष्टिकोन पुरोगामी स्वरुपाचा आहे.या धर्मात समानता मुल्याला महत्व देण्यात आले आहे.धम्म प्रसारात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांचाही लक्षणीय सहभाग असतो.इतर धर्माच्या तुलनेत बौध्द धर्मामध्ये महिलांना विकासाची संधी उपलब्ध करुन दिली आहे.या धर्मामध्ये महिलांना समानतेची वागणूक दिली जाते. एकंदरीत कमी अधिक प्रमाणात सर्वच धर्मात स्त्रीयांची स्थिती थोडीसी आपल्याला इतर स्त्रीयांच्या तुलनेत चांगली आहे असे वाटते. परंतु धर्म आणि संस्कृतीचे बंधन कमी अधिक प्रमाणात या स्त्रीयांवरही आसतात हे कोणीही नाकारु शकत नाही.

प्रस्तुत अध्ययनात महिला डॉक्टरांचे धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे चित्रण केले आहे.धर्म अणि संस्कृतीच्या अनुषंगाने संबंधीत महिला डॉक्टरांना मुलाखत अनुसुचीच्या माध्यमातुन बंदिस्त आणि मुक्त प्रश्न विचारुन त्यांच्याकडून तथ्य संकलित केली आहेत. यामध्ये प्रामुख्याने महिला डॉक्टरांच्या धार्मिक कार्यातील सहभाग, त्यांचे सण-उत्सवातील सहभाग,त्याचे संस्कृती विषयक मत,प्रथा परंपरांचा प्रभाव, नवस,श्रध्दा,अंधश्रध्दा, उपवास, व्रत-वैकल्प,देवपूजा,दैवी अस्तित्वावरील विश्वास, शुभ-अशुभ,भुतबाधा,अंगारा-धुपारा,मासिक धर्म,याच बरोबर ते कोणकोणते धार्मिक कार्यक्रम साजरे करतात.या अनुषंगाने महिला डॉक्टरांना प्रश्न विचारुन त्याचे विश्लेषन करण्यात आले आहे.

**अ) संशोधन विषयाची उद्दिष्टे:-**शासकीय दवाखान्यात नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दीष्टांची निवड करण्यात आली आहे.

१.नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणे.

**ब) संशोधन विषयाची गृहितके :-**

१.नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांना धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यास पूरेसा वेळ देता येत नाही.

२. नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांचे धार्मिका, सांस्कृतिक जीवन समाधानकारक असेलच असे नाही.

**क) संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनात्मक लेखासाठी समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. शासकीय दवाखान्यात नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा या पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे 'प्रश्नावली' या प्राथमिक साधनसमुग्री तंत्राद्वारे तथ्य संकलन करण्यात आले तसेच दुय्यम साधनसामुग्रीचाही समावेश करण्यात आलेला आहे शासकीय दस्तऐवज, मासिके, चित्रपट इत्यादी घटकाचांही गरजेनुसार वापर करून या संशोधनातून संकलित झालेल्या तथ्याचे वर्गीकरण विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

**१) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

सदरील संशोधनात्मक लेखासाठी मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांतर्गत सरकारी दवाख्यान्यात कार्यरत असलेल्या ३०० महिला डॉक्टरांचा अभ्यास करण्यात आला आहे. सर्व जाती-धर्मातील शासकीय नोकरी करणाऱ्या महिला डॉक्टरांचा समावेश यामध्ये आहे.

यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने प्रत्येक जिल्ह्यातील महिला डॉक्टरांच्या संख्येच्या प्रमाणात प्रातिनिधिक स्वरुपात नमुना निवड आलेला आहे.सदरील संशोधनात सरकारी दवाख्यान्यातील डॉक्टर महिलांचा एम.बी.बी.एस. (M.B.B.S.), एम.डी.एम.एस.(M.D.M.S.) समावेश करण्यात आलेला आहे.

**तक्ता क्रमांक - १**

**सांस्कृतिक सण-उत्सव मानसिक ताण-तणाव कमी करण्यासाठी महात्वाचे वाटतात काय याविषयी माहिती**

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रतिसाद | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २७५ | ९७.६६ |
| २ | नाही | २५ | ८.३३ |

| | | |
|---|---|---|
| एकुण | ३०० | १०० |

प्रस्तुत तक्ता क्रमांक १ मध्ये सांस्कृतिक सण-उत्सव मानसिक ताण-तणाव कमी करण्यासाठी महात्वाचे वाटतात काय याविषयी उत्तरदात्यांचे मत स्पष्ट करण्यात आले आहे. प्रश्नांच्या उत्तरा दाखल २७५ म्हणजेच ९७.६६ टक्के डॉक्टर महिलांनी होय असे सकारात्मक उत्तर दिले तर २५ (८.३३%) महिलांनी नाही म्हणले आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, मानसिक ताण-तणाव कमी करण्यासाठी सांस्कृतिक सण-उत्सव उपयोगी ठरतात.

आधुनिक जीवन हे अत्यंत धावपळीचे, दगदगीचे झाले आहे.कामाच्या व्यापातुन सहजपणे सुटका होणे अशक्य आहे.महिला डॉक्टरांच्या बाबतीत तर असे दिसून येते की तयांचे कामाचे तास हे एका शिफ्टमध्ये २४ तास इतके असतात. नोकरीच्या ठिकाणी सर्व व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडून त्यांना कुटुंबाकडेही लक्ष द्यावे लागते. अशा दुहेरी भूमिकेतत त्यांची अत्यंत ओढाताण होते. त्यांचे मानसिक आरोग्य धोक्यामध्ये येते अशावेळी या महिला डॉक्टरांना विरंगुळा म्हणून विविध प्रकारचे सण-उत्सव उपयोगी पडतात. मनावरचा ताण-तणाव कमी करण्यासाठी या महिला डॉक्टर अनेक प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक उत्सवात वेळ मिळेल तेव्हा सहभागी होतात.

याऊलट काही महिला डॉक्टरांच्या मते मात्र अशा प्रकारचे सण-उत्सव मानसिक ताण-तणाव कमी करण्यासाठी महत्वाचे नसतात. मात्र असे मत व्यक्त करणाऱ्या महिलांचे प्रमाण हे नगन्य आहे.

**तक्ता क्रमांक - २**

**डॉक्टर महिलांचे धार्मिक बंधन विषयक मत**

| अ.क्र. | धार्मिक बंधन आहे का | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २३० | ७६.६६ |
| २ | नाही | ७० | २३.३३ |
| एकुण | | ३०० | १०० |

वरील तक्ता क्रमांक २ मध्ये उत्तरदात्या डॉक्टर महिलांचे धार्मिक बंधन विषयक मत स्पष्ट करण्यात आले आहे. भारतीय समाजाचा विचार करता धर्म संस्थेने अनेक प्रकारचे बंधने स्त्रीजीवनावर लादलेले आहेत. या बंधनाचा परिणाम म्हणून स्त्रीयांचे जीवन बंदिस्त झाले आहे. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. स्त्रीयांनी काय करु नये याविषयीचे नकारात्मक निर्देश मनुस्मृती सारख्या ग्रंथामध्ये आढळतात. याच बरोबर, भारतातील हिंदु, इस्लाम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, पारशी इ. विविध धर्मात स्त्रीया विषयक बंधने आहेत. उदा. हिंदू धर्मामध्ये हनुमान मंदिरात स्त्रीयांनी प्रवेश करु नये, इस्लाम धर्मात पिराच्या चौथऱ्यावर स्त्रीयांनी जाऊ नये, मासिक धर्मकाळात तर अनेक प्रकारचे जाचक नियम सर्वच धर्मामध्ये कमी अधिक प्रमाणात दिसून येतात. याचा परिणाम म्हणून स्त्रियांना हवे तसे जीवन जगता येत नाही. म्हणून धार्मिक बंधनाच्या नियमामुळे स्त्री जीवन बंदिस्त आहे.

**तक्ता क्रमांक - ३**

**नोकरी करताना धार्मिक बाबी अडचणीच्या ठरतात का? याविषयी महिला डॉक्टरांचे मत दर्शवणारा तक्ता**

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रतिसाद | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १७८ | ५९.३३ |
| २ | नाही | १२२ | ४०.६७ |
| एकुण | | ३०० | १०० |

यापुर्वीच्या तक्त्यामध्ये स्त्रियांवरती असणाऱ्या धार्मिक बंधनाविषयक महिला डॉक्टरांचे मत व्यक्त करण्यात आले आहे. त्यानुसार महिलांवरती अनेक जाचक बंधने किंवा अटी असलेल्या दिसतात. धार्मिक बंधनामुळे नोकरी करताना स्त्रीयांना काही अडचणी येतात का याविषयी त्यांचे मत जाणुन घेण्याचा प्रयत्न संशोधकाने प्रस्तुत प्रश्नांच्या माध्यमातुन केला आहे. तेव्हा असे आढळून आले की, १७८ (५९.३३) टक्के महिला डॉक्टरांच्या मते धार्मिक बाबीचा नोकरी करताना अडसर ठरतो.तर १२२ (४०.६६%) महिला डॉक्टरांच्या मते नोकरी करताना धार्मिक बाबी अडचणीच्या ठरत नाहीत.

यावरुन हे स्पष्ट होते की, नोकरी करताना धार्मिक बाबी अडचणीच्या ठरतात कारण धर्माचे महिलांवरती अनेक प्रकारचे जाचक बंधने किंवा नियम

लादले आहेत. समाजव्यवस्थेच्या जडणघडणीत स्त्रीयांवरती धर्मसंस्थेच्या माध्यमातून पवित्र अपवित्रेच्या अवैज्ञानिक दृष्टीकोनातुन महिलांनी कोणत्या परिस्थितीमध्ये कसे वर्तन करावे हे सांगितले आहे.

उदा. मासिक पाळी येणे हे नैसर्गिक आहे परंतु या दरम्यान स्त्रियांनी हे करु नये, ते करु नये असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे नोकरी करताना अशा महिलांना या धार्मिक बाबींचे बंधन त्याच्यावरती येते.

**तक्ता क्रमांक -४**

**महिला डॉक्टर घराबाहेर धार्मिक कार्यामध्ये सहभागी होतात किंवा नाही याबाबत माहिती**

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रतिसाद | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १६० | ४६.३३ |
| २ | नाही | १४० | ५३.६७ |
| एकुण | | ३०० | १०० |

प्रस्तुत तक्ता क्रमांक ४ मध्ये महिला डॉक्टर घराबाहेर धार्मिक कार्यामध्ये सहभागी होतात किंवा नाही याबाबत माहिती स्पष्ट करण्यात आली आहे. तथ्य संकलनादरम्यान मिळालेल्या माहितीप्रमाणे १४० (४६.३३) टक्के महिला डॉक्टर घराबाहेर धार्मिक कार्यात सहभागी होतात. तर १६० (५३.६६) टक्के महिला डॉक्टर धार्मिक कार्यामध्ये सहभागी होत नसल्याचे दिसुन आले.

घरामध्ये प्रत्येक महिला धर्माच्या अनुषंगाने विविध धार्मिक कार्य पार पाडतात. उदा. पुजा, अर्चा करणे, उपवार करणे इ. या अगोदर महिलांना प्रश्न विचारण्यात आला होता की, आपल्या घरांमध्ये देवघर का तेवहा सर्वच १००% महिलांनी होय असे उत्तर दिले होते.यावरुन हे स्पष्ट होते की, महिलांचा घरगुती धार्मिक कार्यात सहभाग असतो मात्र घराच्या बाहेर त्यांचा सहभाग हा नगन्य असतो. कारण पितृसत्ताक समाज व्यवस्थेत धार्मिक कार्य करण्याचा, विविध धार्मिक विधी करण्याचा अधिकार हा फक्त पुरुषांनांच आहे त्यामुळे संख्यात्मक दृष्ट्या घराबाहेर धार्मिक कार्यात महिला डॉक्टरांचा सहीभाग हा कमी दिसुन येतो. धर्म हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. व्यक्तीच्या अभौतिक, अध्यात्मिक, मानसिक गरजापुर्तीसाठी धर्माची आवश्यकता असते. स्त्री आणि प्ररुष हे समाजव्यवस्थेचे दोन मुलभूत घटक आहेत.सामाजिक संस्थाचा विचार करता असे लक्षात येते की, स्त्रीयांनी संस्थात्मक पातळीवर गौण किंवा दुय्यम मानले गेले आहे. धार्मिक कार्यासाठी स्त्री आवश्यक आहे म्हणजेच स्त्रीशिवाय धर्मकार्य पूर्ण होऊ शकत नाही मात्र स्वत: धार्मिक कार्य करण्याचा विधी मात्र स्त्रियांना नाही.

धार्मिक, सामाजिक कार्यातील प्रतिष्ठा याबाबत माहिती भारतीय समाज व्यवस्थाही पुरुषप्रधान आहे. भारतात ज्याप्रमाणे पुरुषांना धार्मिक आणि सामाजीक अधिकार आहेत तसे महिलांना नाहीत. लिंगभावानुसार कुटुबांत समाजात स्त्रियांना कनिष्ठ मानले जाते. ज्याप्रमाणे कुटुंबात मुलाला (पुरुष) महत्वाचे मानले जाते तसे स्त्रीयांना मानले जात नाही. राजकारण, संस्कृती, शिक्षण, धर्म इत्यादीमध्ये पुरुषांना प्रतिष्ठा मिळते मात्र स्त्रियांना मिळत नाही. याबाबत महिला डॉक्टरांना काय वाटते यासंबंधी त्यांचे मन जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**तक्ता क्रमांक -५**

**महिला डॉक्टरांना पुरुषाप्रमाणे धार्मिक, कार्यामध्ये प्रतिष्ठा मिळते किंवा नाही याबाबत माहिती**

| अ.क्र. | उत्तरदात्यांचा प्रतिसाद | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १६० | ४६.३३ |
| २ | नाही | १४० | ५३.६७ |
| एकुण | | ३०० | १०० |

वरील तक्त्यामध्ये महिला डॉक्टरांना पुरुषाप्रमाणे धार्मिक, सामाजिक कार्यामध्ये प्रतिष्ठा मिळते किंवा नाही याबाबत माहिती दर्शवण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीप्रमाणे २६८ महिलांनी ८९.३३% होय असे उत्तर दिले तर ३२ महिलांनी १०.६६% नाही असे उत्तर दिले. यावरुन हे स्पष्ट होते की, आधुनिक काळात महिलांचा सामाजिक दर्जा बदलत आहे. डॉक्टर महिलांचा पुरुषाप्रमाणे सामाजिक कार्यात प्रतिष्ठ का मिळत आहे या सबंधीचे कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा असे दिसुन आले की, डॉक्टर हे समाजात प्रतिष्ठेचे पद आहे. या पदामुळे पैसा भरपूर मिळतो,

आर्थिक सुबकत्ता आहे. समाजातील लोक आदर करतात. तसेच त्यांच्याकडे ज्ञान आहे. यासारख्या कारणांमुळे महिला डॉक्टरांना आधुनिक काळात पुरुषाप्रमाणे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक, उपक्रमात प्रतिष्ठा दिली जात आहे.

**निष्कर्ष -:**

१. महिला डॉक्टरांना विरंगुळा म्हणून विविध प्रकारचे सण-उत्सव उपयोगी पडतात. मनावरचा ताण-तणाव कमी करण्यासाठी या महिला डॉक्टर अनेक प्रकारच्या धार्मिक,सांस्कृतिक उत्सवात वेळ मिळेल तेव्हा सहभागी होतात.याऊलट काही महिला डॉक्टरांच्या मते मात्र अशा प्रकारचे सण-उत्सव मानसिक ताण-तणाव कमी करण्यासाठी महत्वाचे नाहीत.

२. धर्म संस्थेने अनेक प्रकारचे बंधने स्त्रीजीवनावर लादलेले आहेत. या बंधनाचा परिणाम म्हणून स्त्रीयांचे जीवन बंदिस्त झाले आहे. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. स्त्रीयांनी काय करु नये याविषयीचे नकारात्मक निर्देश मनुस्मृती सारख्या ग्रंथामध्ये आढळतात. याच बरोबर, भारतातील हिंदु, इस्लाम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, पारशी इ. विविध धर्मात स्त्रीविषयक बंधने आहेत.यास महिला डॉक्टरसुध्दा अपवाद नाहीत.

३. महिला डॉक्टरानां नोकरी करताना धार्मिक बाबी अडचणीच्या ठरतात कारण धर्माने महिलांवरती अनेक प्रकारचे जाचक बंधने किंवा नियम लादले आहेत.समाजव्यवस्थेच्या जडणघडणीत स्त्रीयांवरती धर्मसंस्थेच्या माध्यमातून पवित्र अपवित्रेच्या अवैज्ञानिक दृष्टीकोनातुन महिलांनी कोणत्या परिस्थितीमध्ये कसे वर्तन करावे हे सांगितले आहे.

४. १४० (४६.३३) टक्के महिला डॉक्टर घराबाहेर धार्मिक कार्यात सहभागी होतात. तर १६० (५३.६६) टक्के महिला डॉक्टर धार्मिक कार्यामध्ये सहभागी होत नसल्याचे दिसुन आले.

५. आधुनिक काळात महिलांचा सामाजिक दर्जा बदलत आहे. डॉक्टर महिलांचा पुरुषाप्रमाणे धार्मिक कार्यात प्रतिष्ठा मिळत आहे या सबंधीचे कारण डॉक्टर हे समाजात प्रतिष्ठेचे पद आहे. या पदामुळे पैसा भरपूर मिळतो, आर्थिक सुबत्ता मिळते, समाजातील लोक आदर करतात. तसेच त्यांच्याकडे ज्ञान आहे. यासारख्या कारणांमुळे महिला डॉक्टरांना आधुनिक काळात पुरुषाप्रमाणे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक, उपक्रमात प्रतिष्ठा दिली जात आहे.

**संदर्भ :-**

१. भारतीय स्त्री जीवन- गीता साने, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
२.स्त्री परिवर्तनाची आव्हाने- डॉ. शुभांगी गोटे-गव्हाणे, साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन.
३. भगवान बुध्द, डॉ. आंबेडकर आणि भारतीय स्त्री जीवन, सुशील मुजाधव, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद स्त्री आणि स्त्रीत्व-अशा परुळेकर, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.
४) स्त्री परिवर्तनाची आव्हाने-डॉ. शुभांगी गोटे-गव्हाणे, साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, पान क्र. १३५/१
५) भारतीय स्त्रीयों की समस्या-विरेंद्र प्रकाश शर्मा, पंचशील प्रकाशन, जयपूर,
६. स्त्री मुक्ती चळवळ-महापसेकर ज्योती, पाथ्ये मंडळ, प्रेरणा प्रकाशन, मुंबई.
७. भारतातील स्त्री चळवळीची वाटचाल-कमल भागवत, मालती गाडगीळ-कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.
८. स्त्री प्रश्नांची वाटचाल-परिवर्तनाच्या दिशेने विद्युत भागवत, अरुणा पारगांवकर, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे
९. स्त्री मुक्ती चळवळ-महापसेकर ज्योती, पाथ्ये मंडळ, प्रेरणा प्रकाशन, मुंबई.
१०. साळुंके आ.ह. हिंदू संस्कृती आणि स्त्री लोकवाङ्मय गृह मुंबई
११. मोरे दिनेश 'शिवरायांचा स्त्रिविषयक दृष्टीकोन', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
१२.सोमन अंजली, म.फुले विचार आणि वारसा, युनिक फिचर्स मनोविकास प्रकाशन
१३.अंजली किर्तने, डॉ. आनंदीबाई जोशी काळ आणि कर्तृत्व, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.